MHOS130001552012

नि.दि.दा.क्र.६०/२०१२
यशवंत गिराम विरुध्द
सुदाम अनभुले व इतर

## निशानी क्र.६३ च्या अर्जावरील आदेश
## (घोषीत दिनांक – ०९.१२.२०२५)

सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७ अन्वये वादी यांनी त्यांच्या मूळ दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रस्तुतचा दावा हा मालकी हक्क जाहीर होऊन व अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा हा प्रतिवादीकडून वादीस मिळण्याकरता दाखल केला असुन सदरच्या दाव्यामध्ये वादी यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे मोजणीकरता अर्ज सादर केला होता. सदर अर्ज मंजुर होऊन त्याप्रमाणे मोजणीदार यांनी मोजणी केली व त्याप्रमाणे अहवाल न्यायालयामध्ये सादर केला. सदरच्या अहवालानुसार प्रतिवादी यांनी वादी यांच्या दावामिळकतीवरती दक्षीण बाजुकडील जमीनीवर पूर्व–पश्चीम ०३ आर क्षेत्रावर अतिक्रमण असल्याचे नमुद केले. सदरच्या अहवालानुसार दाव्यामध्ये ज्या ठिकाणी अतिक्रमीत क्षेत्र ०५ आर आहे त्या ऐवजी ०३ आर अशी दुरुस्ती करणे योग्य व न्यायोचीत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी अर्जावर म्हणणे दिले असुन त्यांच्या म्हणण्यानुसार, सदरचा अर्ज हा मंजुर करण्यायोग्य नाही. प्रस्तुतचा दावा हा प्रथम मोजणीवर

अवलंबून असुन दुसऱ्या मोजणीबाबत दाव्यामध्ये कोठेही नमुद केलेले नाही. तरी सदरचा अर्ज नामंजुर करावा.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. वादी, प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दावा हा मालकी हक्क जाहीर होऊन व अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा हा प्रतिवादीकडून वादीस मिळण्याकरता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे व कोर्ट कमीशनर यांनी दाखल केलेल्या अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी यांनी ०५ आर क्षेत्रावर अतिक्रमण केल्याचे नमुद केले आहे परंतू, अहवालानुसार प्रतिवादी यांनी वादी यांच्या ०३ आर क्षेत्रावर अतिक्रमण केले असल्याचे दिसुन येते. सबब, सदरची मागीतलेली दुरुस्ती आवश्यक व महत्त्वाची ठरते. प्रस्तावीत दुरुस्ती केल्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होत नाही. उलट दावा गुणदोषावर निर्णीत होणे सोयीचे ठरते. तसेच प्रस्तावीत दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावात कोणतीही बाधा अगर नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायाचे ठरते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. **निशानी क्र.६३** वरील अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. वादी यांनी योग्य ती दुरुस्ती १४ दिवसांच्या आत न चुकता करावी.
३. वादी यांनी दुरुस्ती केल्यानंतर दाव्याची दुरुस्ती प्रत न्यायालयात व प्रतिवादी यांना द्यावी.
४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

MATE ASHLESHA SOUDAGAR Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR Date: 2025.12.09 17:32:20 +0530

दिनांक : ०९.१२.२०२५

( **श्रीमती अश्लेषा एस. मते** )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | N. V. Koli<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Jr. Dn., Bhoom |
| Date | ... | 09.12.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 09.12.2025 |
| Order uploaded on | ... | 09.12.2025 |